# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078

Address- New Administrative Building, SP Office, Kolgoan, Boisar Road, palghar west

E-Mail- propalghar@gmail.com


**प्रेसनोट क्र.१० दिनांक १८/१०/२०२१**

## केळवा पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. I ५६/२०२१ भा.द.वि.स. कलम- ४०६,४२०,४६५,४६७,४७१ प्रमाणे :-

दिनांक १७/१०/२०२१ रोजी केळवा पोलीस ठाणे हद्दीतील फिर्यादी आदर्श कीणी वय २४ वर्षे, व्यवसाय- नोकरी, रा.एडवण ता.जि.पालघर यांनी फिर्याद दिली की, दिनांक ०३/०४/२०१८ रोजी फेसबुकवर परदेशात नोकरी लावुन देतो या संदर्भात पोस्ट पाहीली. त्याप्रमाणे फिर्यादी व फिर्यादीचे मित्र उत्कर्ष तरे, रा.एडवण यांनी फेसबुकवरील पोस्टवर दिलेल्या मोबाईल नंबरवर संपर्क साधुन आरोपी याचेसोबत चर्चा केली होती. त्यावेळी यातील आरोपी याने माझ्याकडे बाहेर देशात नोकरी उपलब्ध असल्याची माहिती असते. त्यावरुन आम्ही ज्यांना बाहेर देशात नोकरी हवी आहे, त्यांचे पासपोर्ट व्हिजा बनवुन त्यांना नोकरी लावुन देतो, असे सांगितले होते. त्याप्रमाणे यातील आरोपी याने फिर्यादी व फिर्यादीचे मित्रास परदेशात (मलेशिया) नोकरी लावुन देण्याचे अमिष दाखवुन फोनवर संपर्क साधुन फिर्यादी व फिर्यादीचे मित्रास कागदपत्र घेवुन के.पी.इंटरनॅशनल ऑफीस, वाशी येथे बोलावले. त्यावेळी आरोपीत याने मलेशियात हॉटेलमध्ये नोकरी उपलब्ध असल्याबाबत माहिती दिली. फिर्यादी व फिर्यादीच्या मित्राकडुन १,६५,०००/- रुपये स्विकारले. फिर्यादी व त्यांच्या मित्राने आरोपीच्या सांगण्यावरुन मलेशियात जाण्याकरिता पनवेल ते कोची असा ट्रेनने प्रवास केला. कोची विमानतळावर मलेशियात जाण्याचे टुरीस्ट तिकीट दाखविले असता, परत येण्याचे टुरीस्ट तिकीट खोटे असल्याचे समजले. फिर्यादी यांनी आरोपी यांस वेळोवेळी संपर्क करुन पैसे परत मिळण्यासाठी प्रयत्न केले. परंतु आरोपीने फिर्यादी यांचे पैसे परत न केल्याने फिर्यादी व त्यांचे मित्र उत्कर्ष तरे यांना आपली फसवणुक झाल्याचे लक्षात आले. यावरुन आरोपी यांचे विरुध्द केळवा पोलीस ठाणे येथे गु.र.नं.५६/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ४०६,४२०,४६५, ४३७,४७१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा अधिक तपास सापोनि श्री. भिमसेन गायकवाड, प्रभारी अधिकारी केळवा पोलीस ठाणे, हे करित आहेत. सदर गुन्हयातील आरोपी यास अटक करण्याकरिता केळवा पोलीस ठाण्याचे पोलीस पथक तयार करण्यात आले आहे.

Scanned with CamScanner